७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २५ जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ०४ | अंक : ०३२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## रस्ते बंदीवरून पुणेकर संभ्रमात, टप्प्याटप्प्याने मार्ग अर्ध्या तासासाठी बंद

पुणे : पुणे ग्रँड चॅलेंज टूर स्टेज–४ सायकल स्पर्धा आज, शुक्रवार (२३ जानेवारी) शहरातील मध्यवर्ती मार्गांवरून पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले असून, रस्तेबंदीच्या फलकांमुळे नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. नरवीर तानाजी मालुसरे रस्ता, सहकारनगर परिसरातील काही अंतर्गत रस्ते; तसेच डेक्कन भागातील प्रमुख मार्गांवर सकाळी नऊ ते सायंकाळी सहा या वेळेत वाहतुकीसाठी पूर्ण बंदी दर्शवणारे फलक लावण्यात आल्याने नागरिकांत संभ्रम निर्माण झाला आहे. सायकल स्पर्धेचा अखेरचा टप्पा पुणे शहरात पाषाण सर्कल-पुणे विद्यापीठ-सेनापती बापट रस्ता (बालभारती–पत्रकार भवन)-लॉ कॉलेज रस्ता-कर्वे पुतळा चौक-वनाझ–पौड रस्ता- नळस्टॉप-म्हात्रे पूल-सेनादत्त पोलिस चौकी-टिळक चौक-पुरम चौक-शंकरशेठ रस्ता-नेहरू रस्ता-लाल महाल चौक-स. गो. बर्वे चौक-नरवीर तानाजी वाडी चौक-गरवारे चौक-बालगंधर्व चौक अशा प्रमुख भागांतून असणार आहे. स्पर्धकांचा ताफा पुढे गेल्यानंतर संबंधित मार्ग तत्काळ खुले केले जातील, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

# बदलापूरमधील चिमुकलीवरील अत्याचार प्रकरणी डॉ. नीलम गोऱ्हेंनी मुख्यमंत्र्यांना लिहिले निवेदन

### प्रारंभिक बालशिक्षण केंद्रांसाठी स्वतंत्र कायद्याची मागणी; बाल शिक्षण केंद्रात बालकांच्या सुरक्षेसाठी नियमावली व स्वतंत्र जी.आर. ची गरज

पिंपरी (दै. संध्या)

बदलापूर येथे नुकत्याच घडलेल्या एका चिमुकलीवरील विनयभंगाच्या दुर्दैवी घटनेनंतर राज्यातील बाल-सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षणमंत्री दादा भुसे यांना एक निवेदन पाठवले आहे. या निवेदनात प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण केंद्रे (ईसीसीई सेंटर्स) साठी स्वतंत्र कायदा तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, बालकांच्या सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना राबवण्याची विनंती करण्यात आली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी या निवेदनात नमूद केले आहे की, बदलापूर पश्चिम पोलीस स्टेशनला स्वतः भेट देऊन त्यांनी घटनेची वस्तुस्थिती जाणून घेतली. संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. ''मागील ऑगस्ट २०२४ मध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती त्याच भागात होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करते,'' असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

**निवेदनातील प्रमुख मुद्दे:**

डॉ. गोऱ्हे यांनी निवेदनात प्रारंभिक बालशिक्षण केंद्रांच्या सुरक्षेबाबतचे अनेक दोष उघड केले आहेत. मुख्य मुद्दे असे:

१. शासन निर्णयाची अपुरी अंमलबजावणी: मागील घटनेनंतर शासनाने १३ मे २०२५ रोजी एक निर्णय घेतला होता. मात्र, हा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात पूर्वप्राथमिक शाळांमध्ये लागू झालेला नाही. शिक्षण संचालकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या निर्णयाची अंमलबजावणी अपुरी आहे. इतकेच नव्हे, या केंद्रांना हा निर्णय लागू आहे की नाही, याबाबत प्रशासकीय स्तरावर संभ्रम आहे.

२. माहिती संकलनातील त्रुटी: शासनाने पूर्वप्राथमिक शाळांसाठी माहिती भरण्याकरिता एक वेबसाइट सुरू केली आहे. मात्र, ही माहिती भरणे बंधनकारक नसल्याने राज्यात केवळ सुमारे १२,००० केंद्रांनी माहिती अपलोड केली आहे. या माहितीची अधिकृतता आणि विश्वासार्हताही संशयास्पद आहे.

३. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील कमतरता: राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० जाहीर झाले असले तरी, तीन ते सहा वर्षांच्या मुलांसाठी प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण केंद्रे (ईसीसीई सेंटर्स) संदर्भात कोणतीही ठोस नियमावली अद्याप जाहीर झालेली नाही. यामुळे या केंद्रांची सुरक्षा व्यवस्था कमकुवत राहिली आहे.

४. मान्यता आणि तपासणीतील उदासीनता: पूर्वप्राथमिक शाळांना मान्यता देण्याची कोणतीही तरतूद नसल्याने, १३ मे २०२५ च्या शासन निर्णयातील सुरक्षा तपासणीच्या निर्देशांकडे दुर्लक्ष होत आहे. यामुळे बालकांच्या सुरक्षेबाबत प्रशासन उदासीन दिसत आहे.

५. समन्वयाचा अभाव: शासन निर्णयात जिल्हा स्तरावर विविध विभागांमध्ये समन्वय साधण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. यामुळे प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

डॉ. गोऱ्हे यांनी निवेदनात म्हटले आहे की, ''प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण केंद्रे संदर्भात शासन स्तरावर कायदा तयार करणे प्रस्तावित आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, सध्याच्या कायद्याच्या कक्षेत हे केंद्र येत नसल्याने आणि शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत संभ्रम असल्याने, निरागस बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखणे कठीण होत आहे.''

**तातडीच्या कार्यवाहीची मागणी:**

निवेदनात बालसुरक्षेसाठी तातडीने कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे. प्रमुख मागण्या अशा:

१. स्वतंत्र सुरक्षा नियमावली: ० ते ६ वर्षांच्या मुलांसाठी सेवा देणाऱ्या सर्व संस्था (अंगणवाडी, पूर्वप्राथमिक शाळा, ईसीसीई सेंटर्स इ.) साठी स्वतंत्र आणि बंधनकारक सुरक्षा नियमावली तातडीने जाहीर करावी.

२. स्पष्टीकरणात्मक आदेश: सध्याच्या ईसीसीई सेंटर्स, पूर्वप्राथमिक शाळा आणि अंगणवाड्यांना १३ मे २०२५ चा शासन निर्णय स्पष्टपणे लागू असल्याबाबत तात्काळ स्पष्टीकरण देणारे आदेश काढावेत.

३. जिल्हास्तरीय समिती: जिल्हा स्तरावर आंतरविभागीय समन्वयासाठी समिती स्थापन करावी. नियमित तपासणी आणि अहवाल प्रणाली कार्यान्वित करावी.

४. स्वतंत्र कायदा: ईसीसीई सेंटर्ससाठी स्वतंत्र कायदा (ॲक्ट) तातडीने तयार करून विधानमंडळात मांडावा. यात शून्य ते सहा वर्षांच्या मुलांच्या सुरक्षेबाबत ठोस तरतुदी, व्याख्या आणि नियंत्रणाची जबाबदारी निश्चित करावी.

## पुणे - मुंबई एक्सप्रेस-वे वरील कामगारांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

### २६ जानेवारीपासून 'रास्ता रोको' व बेमुदत उपोषणाचा इशारा



पुणे (दै. संध्या) :

पुणे-मुंबई एक्सप्रेस वे वर देखभाल, दुरुस्ती व सुरक्षेचे काम आय आर बी व आर्यन पंप यांच्या व्दारे करणाऱ्या शेकडो कामगारांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप बाळासाहेब भुजबळ संघटन सचिव भारतीय मजदूर संघ यांनी केला आहे. प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून, या अन्यायाविरोधात दिनांक २६ जानेवारी २०२६ पासून पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवरील संबंधित कार्यालयासमोर 'रास्ता रोको' आणि बेमुदत उपोषण करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

**प्रमुख मागण्या आणि समस्या:**

१. वेतनवाढ: सन २०२४–२५ या कालावधीतील कायदेशीर वेतनवाढ अद्याप लागू करण्यात आलेली नाही.

२. ओव्हरटाईम: नियमांनुसार मोबदला न देता केवळ नाममात्र रक्कम देऊन कामगारांची आर्थिक पिळवणूक केली जात आहे.

३. वैद्यकीय सुरक्षा: अपघातग्रस्त कामाचे स्वरूप पाहता सध्याची मेडिक्लेम योजना अपुरी आहे. प्रत्येक कामगाराला किमान ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळावे.

४. सुरक्षा साधने: हेल्मेट, सेफ्टी शूज, जॅकेट, रेनकोट आणि संपूर्ण झझए किट तात्काळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**प्रशासनाला इशारा:** वारंवार बैठका घेऊन आणि लेखी निवेदने देऊनही कंपनी व प्रशासनाने या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. ''या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीस आणि सार्वजनिक गैरसोयीस सर्वस्व प्रशासन व संबंधित कंपनी जबाबदार राहील,'' असा स्पष्ट इशारा भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ यांनी दिला आहे. या आंदोलनात त्यांचे कुटुंबीय आई वडील, पत्नी मुले , स्थानिक नागरिक देखील मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, सदरील रस्ता रोको आंदोलन हे कूसगाव ऑफीस जवळ पास हायवेवर होणार असून मागणीपत्र मान्य होईपर्यंत लढा मागे घेतला जाणार नाही, असा निर्धार सचिन मेंगाळे (पुणे जिल्हा मजदूर संघ) यांनी व्यक्त केला आहे. तसेच अर्जुन चव्हाण, सागर पवार, उमेश विश्वाद, बाळासाहेब पाटील, व भारतीय मज़दूर संघ पदाधिकाऱ्यांसह उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रोडरोलरने चिमुकल्याला चिरडलं, आईच्या डोळ्यासमोर लेकाचा करुण अंत

दौंड : पुण्यातील दौंड शहरात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून, रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामादरम्यान रोड रोलरखाली सापडून चार वर्षांच्या चिमुकल्या मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण दौंड शहर हादरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आर्यन जाधव असे चिमुकल्याचे नाव असून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना दौंड शहरातील जनता कॉलनी परिसरात, सेंट सेबिस्टियन हायस्कूलच्या मागील रस्त्यावर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, दौंड भागातील या परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याचे डांबरीकरण सुरू होते. आर्यन जाधव याची आई याच ठिकाणी मजूर म्हणून काम करत होती. काम सुरू असतानाच आर्यन हा रस्त्याजवळच खेळत असताना, भरधाव वेगाने मागे घेत असलेल्या रोड रोलरखाली तो सापडला. रोडरोलर चालकाचा वेग अत्यंत जास्त होता. लवकरात लवकर काम उरकण्याच्या नादात चालकाने आवश्यक ती खबरदारी न घेता रोलर फिरवला आणि क्षणात आर्यनचा जागीच चिरडून मृत्यू झाला. या घटनेनंतर रोडरोलर चालक घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती आहे.

### 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अनुदान नाहीच...

पुणे: 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी 'ई-केवायसी' केल्यानंतरही गेल्या दोन महिन्यांपासून लाडक्या बहिणींना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ मिळालाच नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या तक्रारी महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांच्यापर्यंत पोहोचल्याने त्यांनी अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणीचे आदेश दिले आहेत. मात्र, हा आदेश अद्याप महिला बालकल्याण अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य सरकारने गेल्या वर्षी लाडक्या बहिणी योजनेचा अनावश्यक लाभ घेणाऱ्या महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चारचाकी असणाऱ्या महिलांची पडताळणी करण्यात आली. त्यातून राज्यभरातून अनेक महिला लाभार्थ्यांना अपात्र ठरवून त्यांना अनुदान बंद करण्यात आले. पडताळणीचा दुसरा टप्पा म्हणून 'ई-केवायसी' बंधनकारक करण्यात आले. ई-केवायसी करताना 'ओटीपी' येत नसल्याचे आढळले. त्यावर घटस्फोट अथवा पती किंवा पिता निधनाचे प्रमाणपत्र जोडण्याची सक्ती करण्यात आली आहे. आता 'ई-केवायसी' केल्यानंतरही पुणे जिल्ह्यासह राज्यातील अनेक लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून योजनेचा लाभ मिळालेला नाही. अनेक महिलांनी याबाबत महिला बालकल्याण विभागासह स्थानिक पंचायत समिती, नगरपालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. काही महिलांकडे चारचाकी असूनही त्या महिलांना पुन्हा अनुदान सुरू केल्याचेही दिसले. शेजारीच राहणाऱ्या महिलेने ई-केवायसी करूनही आणि चारचाकीसह अन्य लाभ सुरू असूनही त्यांना लाभापासून वंचित ठेवले आहे, अशा तक्रारी महिलांनी केल्या. दुसरीकडे ज्यांनी ई-केवायसी केले नाही, अशा महिला लाडक्या बहिणी ठरल्या असून, त्यांना लाभ मिळाला आहे. प्रामुख्याने अनेक ठिकाणी पात्र, अपात्र लाभार्थ्यांची यादीच जाहीर होत नसल्याने योजनेच्या लाभाबाबत लाडक्या बहिणींसह भावांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पात्र, अपात्र लाभार्थ्यांची यादी वेबसाइटवर जाहीर करण्याची मागणी केली आहे. एकाच कुटुंबातील एकच लाभार्थी असूनही ई-केवायसी केले आहे. उत्पन्न अडीच लाखांच्या आत असून, चारचाकी वाहने नसतानाही लाभ अद्याप मिळाले नाहीत, अशीही तक्रार पुढे आली आहे. अनेक महिलांनी पुन्हा ई-केवायसी भरण्यासाठी मुदतवाढ देण्याचीही मागणी केली आहे.

## 'पुणेकरांनी आम्हाला हवा तसा प्रतिसाद दिला नाही', अजित पवारांनी व्यक्त केली नाराजी

बारामती (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा आज चौथा दिवस आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. स्पर्धेच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त करताना, आतापर्यंत आम्ही या स्पर्धेच्या संदर्भात चांगलं काम केलं आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेचे आयोजन सुरू असतानाच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू होती. अशा परिस्थितीतही राज्याचे मुख्यमंत्री उद्घाटनासाठी उपस्थित राहिले, याचा उल्लेख करत अजित पवार म्हणाले, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दौऱ्यावर जावं लागलं तरी त्यांनी वेळ काढून उद्घाटनाला हजेरी लावली, ही बाब महत्त्वाची आहे.

स्पर्धेदरम्यान नागरिकांनी दाखवलेल्या शिस्तीचे त्यांनी विशेष कौतुक केले. या स्पर्धेमुळे लोकांनी चांगली शिस्त पाळली. त्याचबरोबर रस्त्यांची कामंही चांगल्या प्रकारे झाली. त्यामुळे रोडची गुणवत्ता सुधारली असून संपूर्ण रूटही अधिक चांगला झाला आहे, असे ते म्हणाले.

पुणेकरांच्या प्रतिसादाबाबत बोलताना त्यांनी थोडी नाराजी व्यक्त केली. आम्हाला पुणेकर चांगला प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा होती. मात्र पुणेकरांनी आम्हाला तसा प्रतिसाद दिला नाही, अशी नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली. तथापि, या स्पर्धेमुळे पुणे आणि परिसरातील रस्त्यांच्या विकासाला चालना मिळाल्याचे त्यांनी मान्य केले.

महापालिका महापौर आरक्षण सोडतीबाबत उपस्थित झालेल्या आरोपांवर अजित पवार यांनी स्पष्ट भूमिका मांडली. आरक्षण सोडतीमध्ये नेमकं काय झालं, हे मला वाटत नाही की चुकीचं आहे. मी गेली ३५ वर्षे प्रशासनात काम करत आहे. कुणाचा इंटरेस्ट चुकीचं करण्याचा असेल, असं मला वाटत नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच, जर कुणाकडे काही ठोस पुरावे असतील, तर त्यांनी ते समोर आणावेत. संबंधित यंत्रणा त्याची माहिती घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र निवडणूक लढवणार का? या प्रश्नावर अजित पवार यांनी थेट उत्तर देणे टाळले. बघू आता, असे म्हणत त्यांनी या प्रश्नावर काढता पाय घेतला, त्यामुळे या विषयावर राजकीय चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

एकूणच, सायकल स्पर्धेच्या निमित्ताने विकास, प्रशासन, शिस्त आणि राजकारण या सर्व मुद्द्यांवर अजित पवारांच्या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

## शिवसेनेच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेतील शिवसेना पक्षाच्या गटनेतेपदी विश्वजित श्रीरंग बारणे यांची निवड करण्यात आली. शिवसेनेच्या नगरसेवकांची आज (शनिवारी) बैठक पार पडली. यात सर्व नगरसेवकांनी विश्वजित बारणे यांची गटनेतेपदी एकमताने निवड केली.

महापालिका निवडणुकीत शिवसेनेचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. गटनेता निवडण्यासाठी जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यांची पक्षाने नियुक्ती केली होती. त्यानुसार खांडभोर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक झाली. शिवसेना नगरसेवकांनी विभागीय आयुक्त कार्यालयात गटाची नोंदणी केली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना उपनेत्या, नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक निलेश बारणे, निलेश तरस, विश्वजित बारणे, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, रेश्मा कातळे उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले. सर्वांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पिंपरी-चिंचवड शहरात युवा संघटन बळकट केल्यानंतर विश्वजीत बारणे यांनी पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी हाती घेतली. पश्चिम महाराष्ट्रात संघटना बांधणी मजबूत केली आहे. संघटनेतील कामकाजाच्या अनुभवानंतर विश्वजीत यांनी पहिल्यांदाच निवडणुकीच्या राजकारणात उडी घेतली. प्रभाग २४ मधून त्यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढविली. त्यांनी प्रतिस्पर्धी असलेल्या माजी उपमहापौर झामाबाई बारणे यांचे पुत्र माजी नगरसेवक राहिलेल्या भाजपच्या सिद्धेश्वर बारणे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. विश्वजीत यांनी आपल्या नगरसेवकपदाच्या पहिल्या इंनिगला सुरुवात केली आहे. त्यांच्या रूपाने अभ्यासू, तरुण, शहरातील युवा पिढीच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व महापालिका सभागृहात आले आहे. विश्वजीत बारणे यांच्यावर विश्वास टाकून सर्व नगरसेवकांनी गटनेतेपदी नियुक्ती केली आहे.

याबाबत विश्वजीत बारणे म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लोकसभेतील शिवसेनेचे गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे आणि सर्व नगरसेवकांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे. या सर्वांचा विश्वास पात्र ठरवेल. सभागृहात शिवसेनेचा आवाज दिसेल. शहराच्या विकासाच्या निर्णयाला शिवसेनेचा नेहमीच पाठिंबा राहील. मात्र,

## समाजात रुंदावणारी विषमतेची दरी चिंताजनक

### ॲड. प्रार्थना सदावर्ते यांचे मत; समानतेसाठी झटणाऱ्या चळवळींना बळ देण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)



**विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डावीकडून सुलभा मुंगी, डॉ. अशोककुमार पगारिया, शमसुद्दीन तांबोळी, प्रा. शंकर आथरे, प्रकाश रोकडे, मंदाकिनी रोकडे, ॲड. प्रार्थना सदावर्ते, प्रा. चंद्रकांत वानखेडे, संगीता झिंजुर्के.**

सध्या सर्व पातळ्यांवर समाजात रुंदावत जाणारी विषमतेची दरी, हा चिंतेचा विषय आहे. समानतेचे मूल्य सांगणाऱ्या संविधानासमोरील विषमता हे आव्हान आहे, असे मत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी केले. समानता प्रस्थापित करण्यासाठी झटणाऱ्या चळवळींना बळ दिले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विश्वबंधुता साहित्य परिषद, पुणे, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी क्रांतीसूर्य सावित्रीज्योती या पुस्तकाचे प्रकाशन, संविधान गीताचे देशार्पण, वंदे संविधान कविसंमेलन तसेच संविधान गीतकार प्रा. शंकर आथरे यांना मानपत्र प्रदान करण्यात आले.

नवी पेठ येथील पत्रकारभवनात झालेल्या कार्यक्रमावेळी स्वागताध्यक्ष डॉ. अशोककुमार पगारिया, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे शमसुद्दीन तांबोळी, काषाय प्रकाशनाचे प्रा. चंद्रकांत वानखेडे, बंधुता प्रतिष्ठानच्या संचालिका मंदाकिनी रोकडे, बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांच्यासह संयोजन समितीतील सुलभा मुंगी, सीमा गांधी, प्रा. सायली गोसावी व निमंत्रक डॉ. बंडोपंत कांबळे, डॉ. सविता पाटील, प्रा. भारती जाधव, प्रा. प्रशांत रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. प्रार्थना सदावर्ते म्हणाल्या, ‍‍संविधानगीत हा अभिमानाचा ठेवा असून, तो आज देशाला अर्पण करण्यात आला आहे. या गीतात संविधानाचे सार उतरले आहे. त्याचा सर्वत्र प्रसार व्हावा. संविधानापुढे आज अनेक आव्हाने असून, धर्मनिरपेक्षता, समानता, बंधुता या मूल्यांचा ऱ्हास होताना दिसत आहे. सर्व यंत्रणा, न्यायव्यवस्था, तपासव्यवस्था कमकुवत होत आहेत. वाढती राजकीय अस्थिरता, समाजातील विषमता चिंताजनक आहे. विषमता कमी करण्यासाठी संविधानात नव्या तरतुदी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

प्रा. शमसुद्दीन तांबोळी म्हणाले, सध्या सगळीकडे बंधुतेचे तत्त्व पुसून टाकण्याचे प्रयत्न सुरू आहेत. समाजघटकांत परस्परांविषयी द्वेषभाव निर्माण करणे, हाच अजेंडा दिसत आहे. त्याविरोधात बंधुतेची मशाल उभारणाऱ्यांना बळ दिले पाहिजे. संविधानाने सांगितलेली धर्मनिरपेक्षता संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात आपल्याला समता, बंधुतेसाठी काम करावे लागेल. मुस्लिम समाज संविधानवादी व्हावा, यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ कार्यरत आहे. बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी समता आणि बंधुतेच्या माध्यमातून आपला देश हे विश्वबंधुतेचे तीर्थक्षेत्र व्हावे, असा आशावाद व्यक्त केला. सध्याच्या सत्ताधाऱ्यांना फक्त सत्तेची, धनाची, त्यांच्या प्रतिष्ठेची चिंता आहे.

त्यांना आपल्या संविधानाची, देशाच्या अखंडतेची, धर्मनिरपेक्षतेची, सामाजिक समतेची, शेतकरी, श्रमिकांची पर्वा नाही. त्याविरोधात सातत्याने आपला लढा सुरू ठेवला पाहिजे, असे ते म्हणाले. संविधान गीताचे रचनाकार प्रा. शंकर आथरे यांनी संविधान गीताचे गायन केले. उत्तरार्धात वंदे संविधान काव्यसंमेलनाचे सादरीकरण झाले. डॉ. अशोककुमार पगारिया यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. संगीता झिंजुरके यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत वानखेडे यांनी आभार मानले.

# संपादकीय

## ताकदवान स्त्री

स्त्री म्हणजे केवळ कोमलता, सहनशीलता किंवा त्याग यांचं प्रतीक–अशी पारंपरिक ओळख आता कालबाह्य ठरत चालली आहे. आजची स्त्री ही ताकदवान आहे–विचारांनी, निर्णयांनी, आत्मविश्वासाने आणि संघर्षातून घडलेल्या अनुभवांनी. तिची ताकद फक्त हातात नाही, तर मनात आहे; फक्त आवाजात नाही, तर तिच्या शांत ठामपणात आहे.

ताकदवान स्त्री म्हणजे नेहमीच मोठ्या पदावर असलेली, प्रसिद्ध किंवा श्रीमंत असलेली स्त्रीच असते असं नाही. रोज सकाळी उठून संसाराचा डोलारा सांभाळणारी आई, कुटुंबासाठी स्वत:च्या इच्छा मागे ठेवणारी पत्नी, दोन वेळच्या भाकरीसाठी झगडणारी कष्टकरी महिला, शिक्षणासाठी समाजाशी झुंज देणारी मुलगी–या सगळ्यांमध्ये ताकद आहे. फरक इतकाच की ही ताकद अनेकदा गाजत नाही, ती शांतपणे आपलं काम करत राहते.

आजची स्त्री अनेक आघाड्यांवर लढते. घर आणि करिअर यांचा समतोल साधताना ती स्वत:शीच झगडते. अपेक्षा तिच्याकडूनच जास्त असतात–चांगली मुलगी, सुसंस्कृत सून, समजूतदार पत्नी, आदर्श आई आणि यशस्वी व्यावसायिक. या सगळ्या भूमिकांमध्ये वावरताना ती थकत नाही, पण तिचा थकवा दिसत नाही–कारण समाजाने तिला सहन करणं शिकवलं आहे.

ताकदवान स्त्री अन्याय सहन करत नाही–ती प्रश्न विचारते. तिला अन्यायाची जाणीव आहे आणि हक्कांचीही. शिक्षण, रोजगार, समान वेतन, सुरक्षितता, स्वातंत्र्य–या सगळ्यांसाठी ती आवाज उठवते. कधी शांतपणे, कधी आक्रमकपणे, तर कधी व्यवस्थेविरुद्ध उभी राहून. तिचा संघर्ष हा केवळ स्वत:साठी नसतो, तर पुढच्या पिढ्यांसाठी असतो. तरीही समाजात अजूनही स्त्रीच्या ताकदीकडे संशयाने पाहिलं जातं. जास्त पुढे गेली, खूप बोलते, स्वत:च निर्णय घेते–हे शब्द तिच्या आत्मविश्वासालाच दोष देतात. पण ताकदवान स्त्री अशा टीकांनी थांबत नाही. ती अपयशातून शिकते, टीकेतून अधिक मजबूत होते आणि प्रत्येक अडथळ्याला पायरी बनवते.

खरं तर स्त्रीची खरी ताकद तिच्या संवेदनशीलतेत आहे. ती कठोर असतानाच मृदू असू शकते, ठाम असतानाच करुणावान असू शकते. ती जखमी झाली तरी पुन्हा उभी राहते–आणि इतरांनाही उभं राहायला बळ देते. हीच ताकद तिला वेगळी ठरवते.

आज गरज आहे ती ताकदवान स्त्रीला फक्त गौरवण्याची नाही, तर तिला स्वीकारण्याची. तिच्या निर्णयांना, तिच्या स्वप्नांना, तिच्या स्वातंत्र्याला सन्मान देण्याची. कारण स्त्री सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होतं; समाज सक्षम होतो; आणि देशही मजबूत होतो.

शेवटी इतकंच– ताकदवान स्त्री ही कुणाविरुद्ध नसते, ती स्वत:च्या अस्तित्वासाठी, स्वाभिमानासाठी आणि समानतेसाठी उभी असते. आणि जेव्हा स्त्री उभी राहते, तेव्हा ती फक्त स्वत:च नाही, तर संपूर्ण समाजाला पुढे घेऊन जाते.

## संस्कृत सुभाषित

अनाहूत: प्रविशती अपृष्टो बहु भाषते–
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम:।।
(उद्योगपर्व, अध्याय ३३, ४१, महाभारत)

## गुरु वचन

### बाळगा सकारात्मक दृष्टिकोन

यश–अपयश हा जीवनाचा घटनक्रम आहे. यश म्हणजे योगायोग नव्हे. तो दृष्टिकोनाचा परिणाम आहे. नीतीपूर्वक चालल्यानंतरच खरे यश मिळते. यश म्हणजे काही रहस्य नाही तर काही आधारभूत नियमांचे सातत्याने पालन केल्याचा तो सुखद परिणाम आहे.

प्रसिध्द विचारवंत अर्ल नाईटिंगेलच्या मते, मूल्यवान लक्ष्याची सतत प्राप्ती होणे म्हणजेच यश होय. ध्येय किंवा लक्ष्य प्राप्तीनंतर थांबणे म्हणजे यशाचा शेवट आहे. श्रेष्ठतेचा प्रयत्न म्हणजेच यश होय. खऱ्या यशाचे मापदंड आहेत काम योग्य प्रकारे पूर्ण करणे आणि आपले लक्ष्य प्राप्त करणे. कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करण्यासाठी पूर्ण तयारी आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती उद्देश, सिध्दांत, योजना, अभ्यास, सततचे प्रयास, धैर्य आणि अभिमान या गोष्टींची. बहाणेबाजी, संधी ओळखण्यातील अयोग्यता, भीती, अनुशासनची कमतरता, कमजोर स्वभाव, ज्ञानाचा अभाव, साहसाचा अभाव ही देखील अपयशाची कारणे आहेत. ती दूर करूनच यश प्राप्त केले जाऊ शकते.

जीवनात अपयशच खरा सोबती आहे. त्याचं स्वागत केलं पाहिजे. तो नम्रता, संयम आणि धैर्याचे शिक्षण देतो. अडचणीच्या काळात साहस आणि विश्वास प्राप्त करण्यास मदत करतो. व्यक्तीने नेहमी कठीण परिस्थितीतून वर येत जगलं व जिंकले पाहिजे. इतके केल्यानंतर तुम्ही यश सहजतेने मिळवू शकता.

## उपदेशकथा

### व्यसन

एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झालेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे. कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, विडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटे विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शिव १४:०१:१३ |
| २४ जानेवारी २०२५ | करण:कौलव |
| शनिवार | १३:१६:१४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल |
| माघ शके संवत्– १९४७ | २४:४०:१३+ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | सूर्य:मकर |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:मीन |
| मास– माघ | हिजरी सन् – १४४६ |
| ऋतु– सौर शिशिर | मुस्लिम मास – शाबान |
| शुक्ल पक्ष | तारीख – ४ |
| तिथि:षष्टी | विशेष |
| २४:४०:१३+ | मारोतराव मार्ले |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | गांवकर पुण्यतिथी – |
| १४:१५:४२ | नागपूर (नांदेड) |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | 7 | | 1 |
| 6 | | 7 | 9 | | | | 5 | |
| | | | | | | 2 | | 6 |
| 4 | 7 | | 6 | 5 | 9 | | | 3 |
| | | | 1 | | 2 | | | |
| 5 | | | 4 | 8 | 7 | | 1 | 9 |
| 3 | | 8 | | | | | | |
| | 6 | | | | 3 | 9 | | 5 |
| 9 | | 2 | 5 | | | | | 7 |

PRESS SERVICES OF INDIA

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८४१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 9 | 8 | 6 | 5 | 7 | 3 | 1 |
| 6 | 3 | 7 | 9 | 2 | 1 | 4 | 5 | 8 |
| 1 | 8 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 |
| 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 8 | 2 | 3 |
| 8 | 9 | 6 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |
| 5 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 4 | 2 |
| 7 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ४१ – रोमन सम्राट कालिगुलाला त्याच्याच प्रेटोरियन रक्षकांनी मारले.
- ४१ – कालिगुलानंतर क्लॉडियस रोमन सम्राट झाला.
- १४३८ – बासेलच्या समितीने पोप युजेनियस चौथ्याला निलंबित केले.
- १४५८ – मॅथियस कॉर्व्हिनस हंगेरीच्या राजेपदी.
- १६२४ –पोप ग्रेगोरी पंधराव्याने आल्फोन्सो मेन्देझला इथियोपियाचा मुख्य धर्मप्रसारक केला. मेन्देझ या दिवशी गोव्याहून मासावा, इथियोपिया येथे पोचला.
- १६७९ –इंग्लंडचा राजा चार्ल्स दुसऱ्याने संसद बरखास्त केली.
- १७४२ –चार्ल्स सहावा आल्बर्ट पवित्र रोमन सम्राटपदी.
- १८४८ –कॅलिफोर्नियात जेम्स डब्ल्यु. मार्शलला सटर्स मिल येथे ओढ्यात सोने सापडले. यानंतर जगभरातून अभूतपूर्व गर्दी सोने मिळवायला कॅलिफोर्नियात लोटली.
- १९०८ –रॉबर्ट बाडेन–पॉवेलने बॉय स्काउटस सुरू केले.
- १९२४ –सेंट पीटर्सबर्गचे नाव बदलून लेनिनग्राड करण्यात आले.
- १९३६ –आल्बेर सराउ फ्रांसच्या पंतप्रधानपदी.
- १९४३ –दुसरे महायुद्ध – अमेरिकन अध्यक्ष फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट व इंग्लिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी कॅसा ब्लांका येथील परिषद आटोपली.
- १९४५ –दुसरे महायुद्ध – रशियन सैन्याने ऑश्विझ कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प मुक्त केला.
- १९६६ –एअर इंडियाचे बोईंग ७०७ जातीचे विमान युरोपमधील मोंट ब्लान्क या सर्वोच्च शिखरावर कोसळले. ११७ ठार. मृतांत होमी भाभा.
- १९७२ –गुआममध्ये ई.स. १९४४पासून लपलेला जपानी सैनिक, शोइची योकोइ सापडला. याकोइलो दुसरे महायुद्ध संपलेले माहिती नव्हते.

१९८६ – अंतराळयान व्होयेजर २ युरेनसच्या ८१,५०० कि.मी. अंतरावर पोचले.

१९८७ – लेबनोनमध्ये अतिरेक्यांनी अलान स्टीन, जेसी टर्नर, रॉबर्ट पॉलहिल व मिथिलेश्वर सिंग यांचे अपहरण केले.

## जोक

पती : हे बघ, मी जर एकदा चिडलो ना, तर सगळ्या जगाला आग लावून ठेवीन!
पत्नी : घरातला स्टोव्ह बंद पडलाय, त्याला तेवढी आग लावून दाखवा.

## सुविचार

सहनशीलता ही कडू गोष्ट असली तरीही तिची फळे मधुर असतात.

– अज्ञात

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २५.६ | १६.२ |
| अहमदनगर | २५.१ | १३.५ |
| अकोला | २८.२ | १६.६ |
| अमरावती | २७.२ | १६.४ |
| बीड | २८.६ | १५.२ |
| भंडारा | २८ | १४.६ |
| बुलढाणा | २२.६ | ७ |
| चंद्रपूर | २८.७ | १७.८ |
| चेन्नई | २८.८ | २२ |
| नवी दिल्ली | २४.३ | ७.८ |
| धुळे | २८.४ | १९.७ |
| गोंदिया | २७.४ | १६.१ |
| जळगाव | २८.३ | १६.३ |
| कोल्हापूर | २६.६ | १४.६ |
| लातूर | २६.४ | १६.९ |
| मुंबई | २८.३ | २२.४ |
| नागपूर | २७.४ | १५.६ |
| नांदेड | २७.४ | १६.९ |
| नंदूरबार | २७ | १८.४ |
| नाशिक | २७ | १४.५ |
| पुणे | २६.१ | १२.५ |
| पंढरपूर | २७ | १७.१ |
| सातारा | २६.७ | १०.६ |
| सांगली | २७ | १५.१ |
| सोलापूर | २७.३ | १८.१ |
| वर्धा | २८.२ | १६.१ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पिवळा, शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम विनम्र होऊन कार्य केले

**वृषभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण कामकाजात अडचणी आल्यामुळे आपल्याला चिंता लागणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: उत्तर मान सन्मान यश मिळेल. मुलांच्या संबधातील कामात प्रगती राहील.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण भागीदारी व्यवसायात फायदा होईल. अडचणी दूर होतील. स्वनिर्णय घेऊन कामे करा.

**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम नौकरीमध्ये आधिकारी नाराज राहतील. खूप प्रयत्न केले तरी कामात थोडेच यश मिळेल.

**कन्या :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: दक्षिण आज आपली कार्यक्षमता वाढणार आहे. वहान सुख मिळेल.

**तुळ :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम नौकरीमधील कुशलतेमुळे फायदा मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर व्यापारात प्रगतीचे योग आहेत. कलेविषयातील रूची वाढेल.


**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर नौकरीत इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पश्चिम जीवनासाथीशी संबंध सुधारतील. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण योग्य परिश्रम घेतल्याने आपले काम सुरळीत पार पडणार आहे. कौटुंबिक अडचण दूर होईल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक वाद, मतभेद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येणार आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४३



**आडवे शब्द**

आडवे शब्द
१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स–मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

**उभे शब्द**

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख– चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

**जम्बो शब्दकोडे क्र. ८४२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०. धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर : २.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ग्रामविकास विभाग यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीचे निर्देश

कोरेगावमुळ, (दै.संध्या):- ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर नवीन ग्रामपंचायत अस्तित्वात येईपर्यंत प्रशासन सुरळीत चालावे, यासाठी नियमानुसार प्रशासक नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक CIVIL PIL CJ-LD-VC-48 OF 2020 वर १४ ऑगस्ट २०२० रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे.ग्रामविकास विभागाने मुदत संपलेल्या तसेच लवकरच मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यास अनुमती दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर, ग्रामपंचायतींची मुदत संपताच निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय कामकाजात कोणताही खंड पडू नये, यासाठी ही कार्यवाही राबविण्यात येणार आहे.शासन आदेशात प्रशासक नियुक्ती करताना उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी कायदेशीर चौकटीत राहूनच ही प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.या निर्णयामुळे जिल्हा प्रशासनावर मोठी जबाबदारी येऊन पडली असून, ग्रामपंचायतींच्या कारभारात कोणतीही प्रशासकीय अडचण निर्माण होऊ नये तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधा अबाधित राहाव्यात, यासाठी वेळेत प्रशासकांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशाची माहिती मुंबई उच्च न्यायालय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील संबंधित विभागांना देण्यात आली आहे.

### *छाननीमधे एकाच उमेदवाराचा अर्ज बाद,उर्वरित सर्व उमेदवारी अर्ज वैध

कोरेगावमुळ,(दै.संध्या) : जिल्हा परिषद व आंबेगाव पंचायत समिती निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून, जिल्हा परिषदेच्या एका उमेदवाराचा अर्ज तांत्रिक कारणामुळे बाद झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या पाच जागांसाठी एकूण २७, तर पंचायत समितीच्या दहा जागांसाठी ५८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. घोडेगाव येथील तहसील कार्यालयात सर्व अर्जांची छाननी करण्यात आली. यामध्ये पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक या जिल्हा परिषद गटातील उमेदवार रवींद्र जनार्दन वळसे यांच्या अर्जावर ते ठेकेदार असल्याबाबत हरकत घेण्यात आली होती. ही हरकत ग्राह्य धरत निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज बाद केला. उर्वरित सर्व उमेदवारी अर्ज वैध ठरवण्यात आले.

अर्ज छाननीची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पडली असून, याबाबत उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. छाननी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहायक पोलीस निरीक्षक सागर पवार यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### आरोग्य व स्वच्छता समितीच्या सभापतीपदी मंगेशभाऊ कांडगे



कोरेगावमुळ,(दै.संध्या) : जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व पिठासीन अधिकारी नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, गटनेते नितीन गोरे यांच्या नेतृत्वात चाकण नगरपरिषदेतील आरोग्य व स्वच्छता समितीच्या सभापतीपदी येथील श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे खजिनदार व उद्योजक मंगेशभाऊ शिवाजी कांडगे यांची निवड करण्यात आली. चाकण नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या हस्ते मंगेशभाऊ कांडगे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी एड. प्रकाश गोरे, रणजित जरे, प्रेम जगताप, रुपाली कांडगे आदी उपस्थित होते. मंगेशभाऊ कांडगे हे चाकण येथील नवयुग मित्र मंडळाचे सल्लागार असून, दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे संचालक आहेत. कांडगे यांनी यावेळी सांगितले की, " चाकण शहराचा सर्वांगीण आणि गतिमान विकास करण्यासाठी सर्व समिती सभापती व सदस्य यांना विश्वासात व बरोबर घेतले जाणार आहे. आरोग्य व स्वच्छता या क्षेत्रांतील कामांना अधिक गती दिली जाणार आहे."

### प्रजासत्ताक दिनी ज्ञानगंगेत मोफत वैद्यकीय तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन

आळंदी, (दै.संध्या) : ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या नवीन इमारतीच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त व भारत देशाच्या७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सोमवार (ता. २६) रोजी शाळेच्या वतीने मोफत वैद्यकीय तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये समर्थ मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने अनुभवी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये संपूर्ण आरोग्य तपासणी, रँडम शुगर, नेत्र तपासणी, थायरॉईड, त्वचारोग, दंतरोग, बालरोग, अॅक्युप्रेशर तसेच होमिओपॅथिक, आयुर्वेदिक व फिजिओथेरपी आदी तपासण्या व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच शिबिरातील लाभार्थ्यांना विविध रक्त तपासण्यांवर ६० टक्के सवलत दिली जाणार आहे. याचबरोबर जनसेवा ब्लड बँकच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून, शाळेच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू दिली जाणार आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे १८ ते ६० वयोगटातील निरोगी नागरिकांनी या रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असून नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन समाजोपयोगी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन शाळेचे अध्यक्ष विजय रामचंद्र गुळवे यांनी केले आहे.

### कामगारांच्या हक्कांसाठी जेजुरीत जनजागृती शिबिर संपन्न

जेजुरी, (दै.संध्या) : दिनांक 22 कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगार म्हणून कार्यरत असताना कामगारांच्या वेतनातून कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) यासाठी किती टक्के कपात होते, तसेच या योजनांचा प्रत्यक्ष लाभ कसा घ्यावा याबाबत जेजुरी येथे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे जनजागृती शिबिर कडेपठार हॉल येथे पार पडले. शिबिरात कर्मचारी राज्य निगमच्या अधिकारी नीलम गुप्ता व अधिकारी एन. रमेश यांनी कामगारांना ESIC व EPF योजनांची दिली. वेतनातून होणारी कपात, आजारपण, अपघात, प्रसूती रजा, पेन्शन व इतर लाभ याविषयी ही कामगारांना मार्गदर्शन करण्यात आले. जेजुरी येथील किर्लोस्कर फेरस कंपनीत गेली दहा ते पंधरा वर्षे कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या अनेक कामगारांना ESIC व EPF संदर्भातील मूलभूत माहिती नसल्याचे निदर्शनास आले.

# शिंदेवाडीत बिबट्याचा गाभण शेळ्यांवर हल्ला

**एक शेळी ठार तर दोन मरणासन्न अवस्थेत**



कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या पश्चिमेकडील मलठण च्या शिंदेवाडी शिवारात आज शनिवार दि.२४ ला पहाटे ३ च्या सुमारास शेतात दावणीला बांधलेल्या ३ गाभण शेळ्यांवर शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली असून यातील एक शेळी जागेवरच ठार झाली तर अन्य दोन शेळ्या देखील मरण्याच्या वाटेवर असल्याची माहिती शेतकरी महिला आदिका संजय चोरामले यांनी दिली. या घटने बाबत शिरूर वन विभागास माहिती देण्यात आली असून वन रक्षक नारायण राठोड यांनी तात्काळ घटना स्थळी धाव घेत पंचनामा केला आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती देताना अदिती चोरमले यांनी सांगितले कि,आज पहाटे ३ च्या सुमारास कुत्र्याच्या जोरदार भुंकण्याने जाग आली. मी व मुलाने तात्काळ शेळ्या बांधल्या होत्या त्या दावणीकडे धाव घेतली.तोपर्यंत एका गाभण शेळीवर जोरदार हल्ला करीत तिला ठार केले होते. त्या मृत शेळीस पाहत असताना च बिबट्याने पुन्हा फिरून येत दावणीला बांधलेल्या इतर २ गाभण शेळ्यांवर पुन्हा हल्ला करीत खुंट्या,दोरी सह दोन्ही शेळ्या नजीकच्या मका पिकात ओढत नेल्या दरम्यान आदिती यांचा १७ वर्षीय मुलगा कार्तिकने बॅटरीच्या उजेडात एका बाजूने शेळी ओढून धरत तर दुसऱ्या बाजूने बिबट्या त्यांना ओढत असताना शेळ्यांना शर्थीचे प्रयत्न करून बिबट्याच्या तावडीतून सोडविले.तोपर्यंत त्या दोन्ही शेळ्या गंभीर जखमी झाल्या होत्या. दरम्यान आरडाओरडा केल्याने बिबट्याने मका पिकातून धूम ठोकली. एक गाभण शेळी मृत व दोन मरणासन्न अवस्थेत असल्याने कुटुंबाचे सुमारे ६० ते ७० हजार रुपयांचे नुकसान होणार असल्याचे अदिती यांनी सांगितले.

निळकंठ गव्हाणे - वन परिक्षेत्र अधिकारी,शिरूर

"शिंदेवाडी शिवारात एकाच वेळी ३ शेळयांवर बिबट्याने हल्ला केल्याची माहिती मिळाली असून घटनेचा तात्काळ पंचनामा करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.तसेच या ठिकाणी तात्काळ पिंजरा लावण्याच्या सूचना ही करण्यात आल्या असून मृत झालेल्या शेळीची नुकसान भरपाई शासन नियमानुसार संबंधित शेतकऱ्याला नक्कीच मिळेल. नागरिकांनी देखील आपापल्या जनावरांची,पाळीव पशूंची योग्य ती सुरक्षितता घ्यावी."

- सुभाष शेटे,९९७५६७४२८६

## कृती समितीच्या माध्यमातून 'समस्या व सुधारणा' बाबत प्रशासनास निवेदन

कोरेगावमुळ (दै. संध्या)

देशाच्या व शासनाच्या आर्थिक जडणघडणीत महत्त्वाचा समजला जाणारा विभाग म्हणजे महसूल व भूमी अभिलेख विभाग. ब्रिटीश काळापासूनचं संपूर्ण प्रशासनात या विभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

सर्वसामान्य शेतकरी,नागरिकांच्या शेतजमिनीचे रेकॉर्ड ठेवणे, जमिनीच्या जुन्या अभिलेख व दस्तऐवजांचे संवर्धन करणे, अर्जानुसार शेतजमिनीची मोजणी करणे, मोजणी बाबतच्या तक्रार, हरकतीबाबत न्यायीक प्रकरणे हाताळणे, नागरिकांना त्यांच्या जमिनी संदर्भातील विविध शासकीय कागदपत्रांची पुर्तता करणे अशी आणि यासारखी अनेक कामे या कार्यालयाच्या माध्यमातून होत असतात. परंतु अलीकडच्या काळात वाढते नागरीकरण,औद्योगिकरण, पायाभूत सुविधा प्रकल्पांची उभारणी या कारणांमुळे जमिनीला सोन्याचे भाव प्राप्त झाले आहेत.जमिनीच्या खरेदी-विक्रीतून हि शासनाच्या तिजोरीत मोठा महसूल जमा होऊन,मोठी आर्थिक उलाढाल होत असल्याने या विभागातही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचे पेव फूटू लागले आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आलेल्या कारवाईत 'लाच घेण्यात' हा विभाग अव्वल स्थानावर असल्याचे लाचलुचपत विभागाच्यावतीने जाहीर केलेल्या शासकीय आकडेवारीने पहायला मिळते. अलीकडे पुणे जिल्ह्यासह राज्यातील सर्वच जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना या विभागाच्या चुकीच्या व मुजोर कामकाजाला सतत सामोरं जावं लागतं आहे.

राज्यात महसूल व भूमी अभिलेख विभागाचा कारभार कसा चालतो हे सर्व जनतेला आता चांगलेच ज्ञात झाले आहे.

नागरिकांना सेवा हमी कायद्यान्वये सेवा प्रदान न करणं, अर्ध-न्यायीक प्रकरणाचा निपटारा वेळेत न करणं, किरकोळ कामकाजासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारायला लावणे, शासन परिपत्रक व नियमाला अधिन न राहता बेजबाबदारपणे कामकाज करणे, मोजणी वेळेत न करणे,मोजणीच्या हद्दी पुर्ण शहानिशा न करता चुकीच्या दाखवणे, नकाशा व महसूली कागदपत्रांमध्ये फेरफार करणे, आर्थिक फायद्यासाठी चुकीची महसूली कामे करणे आदी बेजबाबदार, बेकायदेशीर व नागरी हिता विरुद्ध कामकाज अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून वारंवार होत असल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिक करत असतात. चुकीच्या व भोंगळ कारभारामुळे सर्व सामान्य नागरिकांना विनाकारण वेठीस धरण्याचा व नाहक त्रास देण्याचा हेतु यातून दिसून येत आहे. या नागरी समस्या व प्रश्नांप्रती वाचा फोडून,हा नागरी विषय लोकप्रतिनिधी व शासनापर्यंत पोहचवण्यासाठी व निद्रिस्त झालेल्या या विभागाला जागृत करण्यासाठी २६ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे जनआंदोलन होणार आहे. नागरी समस्या, तक्रारींची सोडवणूक,कामकाज,व्यवस्थेत पारदर्शकता व परिवर्तन निर्माण होण्यासाठी हे पाऊल नागरिकांना उचलावे लागत असल्याचे संयोजक समितीच्यावतीने नमूद करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनी, सकाळी ठिक ८.३० वाजता जमाबंदी आयुक्त कार्यालय येथे हे आंदोलन होणार असून, महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या भोंगळ व बेजबाबदार कारभारामुळे बाधित व ग्रस्त असणाऱ्या शेतकरी बांधवांनी व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या न्याय-हक्क, अधिकार व मागण्यांसाठी* बहुसंख्येने या जन आंदोलनात सहभागी व्हावे,असे आवाहन संयोजक व कृती समितीच्यावतीने करण्यात आले आहे. आंदोलन स्थळ -: जमाबंदी आयुक्त कार्यालय,विधान भवन समोर, पुणे.भूमी अभिलेख तक्रारदार संघर्ष व सुधारणा कृती समिती.

## वडगाव घेनंद येथे तरुणाला मारहाण करून विहिरीत ढकलले

चाकण (दै. संध्या)

शेतातील कुंपणाच्या वादातून एका तरुणाला जीवे मारण्याच्या उद्देशाने विहिरीत ढकलून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खेड |तालुक्यातील शेल पिंपळगाव नजीक वडगाव घेनंद येथे ही घटना घडली.

नागेश थोरवे याने सचिन बादवे आणि त्यांच्या सोबत असलेल्या शंभू मोरय यांना शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. थोरवे याने शंभूच्या जबड्यावर काठीने प्रचंड प्रहार करून त्याला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने विहिरीत ढकलून दिले. सुदैवाने नातेवाईकांनी वेळीच धाव घेतल्याने शंभूचा जीव वाचला आहे.

## कडाचीवाडी येथील ठाकरवाडी मध्ये शिक्षण झालं स्मार्ट

चाकण : (दै. संध्या)

कडाचीवाडी येथील ठाकरवाडीमध्ये शिक्षण स्मार्ट झालं आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये एक अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

शिक्षण शहरी भागातील मुलांच्या प्रमाणे ग्रामीण भागातील मुलांना स्मार्ट शिक्षण मिळण्यासाठी मुंबई माता बाल संगोपन केंद्र खेड व जॅग्वार कंपनी जेएल आर यांच्या संयुक्त सहकार्याने खेड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २२ शाळांना इंटरॲक्टिव्ह बोर्ड व संगणक संच वाटप करण्यात आले. यासाठी संस्थेचे सचिव डॉ.माधव साठे, अमेय जोशी, सुनील राजपूत, स्वाती शिंदे, सुखदेव साळुंखे, निलेश पांडे, सुजित हासे, अशोक मांजरे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. साधारणपणे एक इंटरॲक्टिव बोर्ड व संगणक यांची एकूण १.५ लक्ष रु. किंमत आहे. जॅग्वार यांनी ३३ लाख रु. खर्च करून खेड मधील २२ शाळांना त्याचे वाटप केले आहे.



## मेदनकरवाडी - काळुस गटात कमळ फुलवू, डॉ. खांडेभराड यांचा निर्धार

चाकण : (दै. संध्या)



मेदनकरवाडी - काळुस या जिल्हा परिषद गटात भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणूकीत रंगत वाढली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी कार्यरत असलेले डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी अखेरच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज खेडचे प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांच्याकडे दाखल केला. याप्रसंगी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष एड. किरण झिंजुरके, उद्योजक संदीप सोमवंशी, भाजपा नेते भगवान मेदनकर, बापूसाहेब थिटे, रूपाली खांडेभराड उपस्थित होते. मेदनकरवाडी - काळुस हा जिल्हा परिषद गट आर्थिक व राजकीय दृष्ट्या सक्षम असल्याने मोठ्या प्रमाणात उलथापालथ होणार आहे. डॉ. खांडेभराड यांनी अखेरच्या दिवशी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या गटाकडे सुज्ञ मतदारांचे लक्ष लागले आहे. तळागाळात काम करणारे डॉ. खांडेभराड यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात एकजूट दाखवली.

वाद्यवृंदाच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत कार्यकर्त्यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले. दत्ताभाऊ तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत मतदारांनी परिसर दणाणून सोडला होता. काळुस - मेदनकरवाडी या जिल्हा परिषद गटातील विकास, पाणी, रस्ते, वीज, आरोग्य तसेच सामाजिक प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत खांडेभराड यांनी जनतेत आपली ठाम ओळख निर्माण केली आहे. या जिल्हा परिषद गटात आर्थिक दृष्ट्या सदन असलेले सर्वपक्षीय उमेदवार रिंगणात उतरल्याने या गटातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डॉ. खांडेभराड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने इतर उमेदवारांपुढे कडवे आव्हान उभे राहिले आहे.

## आळंदीत अमृतानुभव पतसंस्थेतील साडेअकरा कोटींचा अपहार

आळंदी (दै. संध्या)

■ व्यवस्थापकासह तिघांविरुद्ध गुन्हा

येथील अमृतानुभव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादितमध्ये तब्बल ११ कोटी ३ लाख १३ हजार ३८० रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पतसंस्थेचे व्यवस्थापक व इतर दोन जणांनी संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक केल्याचा आरोप असून, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी संजय जयसिंग शिर्के (वय ५८, रा. आळंदी देवाची) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, अमृतानुभव नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने आरोपी बाळु अर्जुन पवार (रा.चहोली खुर्द) यांची व्यवस्थापक/सचिव म्हणून नियुक्ती करून संस्थेच्या सर्व व्यवहारांचे अधिकार दिले होते. मात्र, या अधिकारांचा गैरवापर करून आरोपी यांनी इतर दोन जन यांनी परस्पर संगनमताने बनावट कागदपत्रे तयार केली. या बनावट कागदपत्रांच्या आधारे अस्तित्वात नसलेल्या किंवा खोट्या कर्जदारांच्या नावाने सोने तारण कर्ज मंजूर करून कर्जाची रक्कम परस्पर काढून घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच, संस्थेने नियुक्त केलेले सोनार व ऑडिटर यांनीही खोटे अहवाल सादर करून सभासद व संचालक मंडळाचा विश्वासघात केल्याचा आरोप आहे.

आरोपी क्रमांक १ बाळु पवार, आरोपी क्रमांक २ संजय मोहन लांडगे (रा. हडपसर, पुणे) आणि आरोपी क्रमांक ३ पुर्णानंद अरविंद खोलम (वय ५२, व्यवसाय सराफ, रा. चहोली बुद्रुक, बाजार पेठ) यांनी मिळून संस्थेचा एकूण ११.०३ कोटी रुपयांचा अपहार करून फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यातील आरोपी क्रमांक ३ यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे. या घटनेमुळे सहकारी क्षेत्रात खळबळ उडाली असून, सभासदांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

जुन्नर (दै. संध्या)

१४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे व जिल्हा न्यायालय व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार, राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये (Pre-litigation) दाखलपूर्व प्रकरणे, विज व पाणी बिल देयके, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावे, कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, कर्मचारी नुकसान भरपाई प्रकरणे व इतर दिवाणी व फौजदारी तडजोड योग्य प्रकरणे या तडजोडीने निकाली काढले जातात. लोकअदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली निघाल्यामुळे दोन्ही पक्षांचा विजय होतो. तडजोडीने झालेल्या निर्णयानुसार न्यायालयीन फिस पक्षकाराला परत मिळते. पक्षकारांच्या वेळेची बचत, कमी खर्च व त्वरीत न्याय मिळतो.

# चाकण येथे स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**जीवनशेठ खराबी यांचा निर्धार**

चाकण (दै. संध्या)

हिंदुरुदय सम्राट, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून चाकण येथे चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

चाकण येथे स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालयात हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी गटनेते नितीन गोरे, नगरसेवक एड. प्रकाश गोरे, हर्षद लेंडघर, रणजित जरे, प्रेम जगताप, अनिल लोहकरे, मंगेश कांडगे, महेश शेवकरी, शशिकांत जाधव, नगरसेविका जयश्री नायकवाडी, आरती परदेशी, साधना गोरे, रुपाली कांडगे, पूनम शेवकरी, अनिता घोगरे, स्वाती लेंडघर, उद्योजक विकास गोरे, विशाल नायकवाडी, शाम राक्षे, राजेश जाधव, सुनिल शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ व महिला आणि स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या उत्तुंग कार्याचा गौरव करून नगराध्यक्षा मनिषा गोरे म्हणाल्या," ठाकरे हे सर्वसामान्य जनतेच्या गळ्यातील ताईत होते. त्यांची व्यासंगी परंपरा व स्मृती जतन करण्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जोपर्यंत विश्वाला गती आहे तोपर्यंत बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याची फुलबाग टवटवीत राहणार आहे." यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून ठाकरे यांच्या कार्याचा गौरव केला.








# उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत पुणे ग्रँड टूरच्या अंतिम टप्प्याचा बालेवाडी येथे शुभारंभ

## पुणे ग्रँड टूरमुळे पुण्याचे नाव जागतिक पातळीवर झळकले : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे (दै. संध्या)**

पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन करत दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण केल्या असून, याबाबत केंद्र सरकारसह देश-विदेशातील सायकलपटूंनी समाधान व्यक्त केले आहे. या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचले असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री पवार आणि केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ङ्गपुणे ग्रँड टूरफ्च्या अंतिम टप्प्याला श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय सायकलिंग संघटनेच्या (युसीआय) महासंचालक अमिना लानाया, आशियाई सायकलिंग महासंघाचे अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव दातो मनिंदर पाल सिंग, अभिनेता अमीर खान, पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, क्रीडा व युवक सेवा आयुक्त शीतल तेली उगले, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, बजाज ऑटोचे कर विभागाचे उपाध्यक्ष चेतन जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, बजाज पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. या स्पर्धेला शहर व ग्रामीण भागातील क्रीडारसिकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला असून, युवक, युवती,महिला, शेतकरी, विद्यार्थी आदी सर्व घटकांचा त्यात सहभाग दिसून आला. यापूर्वी पुण्यात झालेल्या स्पर्धेलाही पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.

आगामी ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावे यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील असून, क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि प्रतिभावंत खेळाडू घडावेत या उद्देशाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे उभारण्यात आले आहे. राज्यासह देशात अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत राहील, असेही श्री. पवार यांनी सांगितले. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या, पुणे ग्रँड टूरचे महाराष्ट्र सरकार व जिल्हा प्रशासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत-२०४७ या संकल्पनेच्या पूर्ततेत क्रीडा क्षेत्राचा मोठा वाटा असणार असून, देश क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करताना दिसत आहे. क्रीडा क्षेत्राला सॉफ्ट पॉवरच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. शासन व प्रायोजकांच्या सहकार्याने स्पर्धेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. जागतिक पातळीवरील खेळाडूंना एकत्र आणून क्रीडा पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आला असून, भारत क्रीडा पर्यटनाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे, ही अभिमानाची बाब आहे.


यावेळी अभिनेता अमीर खान यांनीही पुणे ग्रँड टूरच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. दरम्यान, जर्मनीचे सायकलपटू बेंडकी बेकर यांना यावेळी मानवंदना (गार्ड ऑफ ऑनर) देण्यात आली. बेकर यांनी सलग २० वर्षे सायकलपटू म्हणून विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, या स्पर्धेनंतर ते सायकलिंगमधून निवृत्त होत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पुरंदरमध्ये छाननीअंती १५१ अर्ज वैध... २७ तारखेकडे सर्वांचे लक्ष

सासवड : पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी एकूण १५४ उमेदवारी अर्जांपैकी गुरुवारी (ता. २२) छाननी मध्ये तीन अर्ज अवैध ठरले असून १५१ उमेदवारी अर्ज वैध ठरले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांनी दिली. पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषदेचे चार गट तर पंचायत समितीचे आठ गण आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेच्या चार गटांतून एकूण ५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. यामध्ये गराडे गटातून सहा, बेलसर गटातून १४, वीर गटातून २० आणि निरा गटातून १३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते., ते सर्व वैध ठरविण्यात आले आहेत. तर पंचायत समितीच्या आठ गणातून एकूण १०१ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. यामध्ये गराडे गणातून आठ, दिवे गणातून १३, माळशिरस गणातून १८, बेलसर गणातून १४, भिवडी गणातून सात, वीर गणातून १०, कोळविहीरे गणातून २१ आणि निरा शिवतक्रार गणातून १० उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. यामधील दिवे गणातील तीन उमेदवारी अर्ज छाननीत अवैध ठरविण्यात आले. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत २७ जानेवारी पर्यंत असून त्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईल. दरम्यान, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी या प्रमुख पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत तर काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), आम आदमी पार्टी, वंचित बहूजन आघाडी, प्रहार जनशक्ती आणि अपक्षांनी काही जागांवर उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे काही गटांत पंचरंगी, चौरंगी, तिरंगी लढती होण्याची चिन्हे आहेत.

### मतमोजणी केंद्रावर गोंधळ घातल्यानं गुन्हा दाखल



पुणे : महापालिका निवडणूक निकालादरम्यान मतदान केंद्रावर रुपाली पाटील यांनी गोंधळ घातला.सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी रुपाली पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.रुपाली पाटील यांनी हा गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रतिक्रिया दिली आहे.माझ्यावर खोटा गुन्हा दाखल झाला असून याला मी घाबरत नाही असं रुपाली पाटील म्हणाल्या.न्याय व्यवस्थेवर माझा विश्वास आहे मला न्याय मिळेल असंही रुपाली पाटील यांनी सांगितलं.

# जीवनशेठ खराबी यांच्या अर्जावरील आक्षेप फेटाळले

**चाकण (दै. संध्या)**

महाळुंगे - नाणेकरवाडी जिल्हा परिषद गटाचे शिवसेना उबाठा पक्षाचे अधिकृत उमेदवार जीवनशेठ मोहन खराबी यांच्या उमेदवारी अर्जावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार गणेश बोत्रे यांचे सुचक मंगेश सातव यांनी खराबी यांच्या नामनिर्देशन पत्रात जोडलेल्या शपथपत्र अर्जावर निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांच्याकडे आक्षेप घेतला होता.

मात्र खराबी यांच्यावरील आक्षेप फेटाळण्यात आला असून, उमेदवारी अर्ज वैध ठरवून खराबी यांना निवडणूक लढविण्याची मुभा देण्यात आली आहे. गणेश बोत्रे यांचे सूचक सातव यांनी खराबी यांच्या शपथ पत्रात प्रॉपर्टी दाखवण्यात आली नाही व गायरानामध्ये अतिक्रमण केले, असे आक्षेप घेतले होते. या आक्षेपांमुळे खराबी यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्याची मागणी करण्यात आली होती. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी या आक्षेपांची सुनावणी घेतल्यानंतर हा आक्षेप पूर्णपणे फेटाळून लावला. त्यांनी जीवन खराबी यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरवला आणि त्यांना निवडणूक लढविण्यास मुभा दिली आहे.


जीवन खराबी यांचा अर्ज वैध ठरताच खराबी यांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा केला. परिसरात फटाके फोडण्यात आले आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिवसेना (उबाठा) कार्यकर्ते आणि स्थानिक समर्थकांनी हा निर्णय आपल्या बाजूने मोठा विजय मानला आहे.

महाळुंगे नाणेकरवाडी गटात येत्या जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील ही लढत आता टोकाची व अधिक रंगतदार होणार असून, दोन्ही बाजूंकडून जोरदार प्रचार सुरू होण्याची शक्यता आहे. निवडणूक प्रक्रिया आता अधिक रोमांचक टप्प्यात आली आहे.

**आमचा नाद करायचा नाय....**

जीवनशेठ खराबी हे चाकण पंचक्रोशीतील अत्यंत उत्साही आणि कर्तबगार नेतृत्व आहे. त्यामुळे त्यांचा या निवडणुकीत शंभर टक्के विजय होणार आहे. त्यामुळे जीवनशेठ खराबी यांचा कोणी नाद करायचा नाय. आमचा विजय निश्चित असून, विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. विरोधकांनी खोडसाळपणे हे आरोप केले असून, आम्ही मतांचा धो धो पाऊस झेलून विक्रमी मतांनी विजय होणार आहे. मतदार आता सुज्ञ झाला आहे.

**- जीवनशेठ खराबी**,. उमेदवार, शिवसेना उबाठा गट



# जेजुरी येथे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी सामाजिक उपक्रम 'जिजामाता विद्यालयात मोफत चष्मा वाटप

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या नेत्र तपासणी कार्यक्रमांतर्गत जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथे विद्यार्थ्यांना मोफत चष्मा वाटपाचा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

डोळा हे आपल्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय असून डोळ्यांशिवाय मानवी जीवन पूर्णतः अंधारमय होते. जगात सुमारे साडेचार कोटी लोक अंध असून त्यापैकी भारतातच एक कोटीहून अधिक नागरिक दृष्टीअभावी विविध अडचणींना सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य व समाजोपयोगी ठरला आहे .



या कार्यक्रमांतर्गत नेत्र तपासणीत दृष्टीदोष आढळलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव व विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या हस्ते चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्राचार्य नंदकुमार सागर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना डोळ्यांच्या आरोग्याचे महत्त्व विशद केले तसेच नियमित तपासणी व योग्य काळजी घेण्याचे आवाहन केले.

यावेळी पर्यवेक्षक लीना पायगुडे,माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप, ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक, सोमनाथ उबाळे, राजाराम पिसाळ, सोनबा दुर्गाडे, पोपट राणे, मीना भैरवकर, मधुसूदन जगताप, वर्षा देसाई, पांडुरंग आटोळे, महेश खाडे, शोभा पठारे, निर्मला निगडे, राघू हारुळे, सविता चव्हाण, संपतराव कड, गणेश खळदकर, संगिता कुंभारकर, उज्वला शिंदे, कैलास सोनवणे, राजेंद्र ताम्हाणे, कुलदीप साळवे, सागर चव्हाण, मयूर शिंदे, गणेश भंडलकर, योगेश घोरपडे, अजय जगताप, पुनम बाठे, ज्योती धुमाळ उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन विद्यालयाच्या आरोग्य विभाग प्रमुख सीमा राणे यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्यविषयक बाबींना प्राधान्य देणारे असे उपक्रम जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवित असून पालक, विद्यार्थी व नागरिकांनी या उपक्रमाचे

# जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी

## सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक व प्रवासी संघटनांची संयुक्त भूमिका

**जेजुरी (दै. संध्या)**

राज्यातील महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र असलेल्या जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना थांबा मिळावा, तसेच स्थानकाचा सर्वांगीण विकास व्हावा, या मागणीसाठी जेजुरी येथील सामाजिक कार्यकर्ते, रेल्वे प्रवासी संघटना आणि लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे, भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश डोंबे, अपक्ष विजयी नगरसेवक तानाजी खोमणे, ग्रामस्थ मानकरी अमोल शिंदे यांनी जेजुरी रेल्वे स्थानकाची प्रत्यक्ष पाहणी करत भाविक, प्रवासी व पर्यटकांशी संवाद साधला. तसेच रेल्वे प्रशासनाला निवेदन देत जेजुरी रेल्वे स्थानक सर्व सोयीसुविधांनी युक्त करावे व लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना थांबा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

जेजुरी हे केवळ तीर्थक्षेत्र नगरी नसून, औद्योगिक वसाहत, नियोजित आयटी क्षेत्र, प्रस्तावित विमानतळ व मेट्रो प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील महत्वाचे केंद्र ठरत आहे. तसेच वाढत्या भाविक व पर्यटकांच्या ओघाच्या तुलनेत जेजुरी रेल्वे स्थानकाचा विकास अपुरा असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

स्थानकावरील प्रतीक्षा कक्ष बहुतांश वेळा बंद अवस्थेत असतो. स्वच्छतागृहांची कमतरता, पिण्याच्या पाण्याची अडचण व अस्वच्छ परिसर याबाबत मुंबईहून आलेल्या महिला भाविकांनी नाराजी व्यक्त केली. केंद्र सरकारकडून रेल्वेचे झपाट्याने आधुनिकीकरण सुरू असताना जेजुरी रेल्वे स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजनेत समावेश न होणे ही दुर्दैवी बाब असल्याचेही सांगण्यात आले.

जेजुरीत दरवर्षी आठ ते नऊ यात्रा भरतात. या काळात आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेशसह संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक येतात. मात्र महालक्ष्मी, सह्याद्री, गोवा–हुबळी, गुजरात–राजस्थान मार्गे दिल्लीकडे जाणाऱ्या कोणत्याही लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना जेजुरी येथे थांबा नाही. त्यामुळे भाविक, पर्यटक, उद्योजक व कामगार वर्गाला पुणे, सातारा किंवा कराड येथे उतरून प्रवास करावा लागतो, अशी खंत व्यक्त करण्यात आली.

जेजुरी रेल्वे स्थानकापासून जवळच मोरगाव, नारायणपूर, भुलेश्वर, पांडेश्वर, वीर म्हस्कोबा, सासवड येथील शिवमंदिरे, बालाजी मंदिर व किल्ले पुरंदर ही प्रमुख धार्मिक व पर्यटनस्थळे असून ती सध्या अधिक विकसित होत आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देणे अत्यावश्यक असल्याचे मत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.



या मागणीसाठी लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती विजय खोमणे यांनी दिली

जागतिक ओळख मिळवणारे लोकोत्सवाचे केंद्र असून जेजुरीची सोमवती यात्रा, विजयादशमी उत्सव यांसारखे भव्य यात्रा–उत्सव केवळ राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरात आणि परदेशातही प्रसिद्ध आहेत. लाखोंच्या संख्येने भाविक व पर्यटक येथे येत असून, कुलधर्म-कुलाचार, पारंपरिक संस्कृती व लोकोत्सवाचा अद्वितीय संगम अनुभवतात. विशेषतः भंडाऱ्याच्या प्रचंड उधळणीमुळे पिवळ्या भंडाऱ्यात न्हालेल्या जेजुरीची क्षणचित्रे जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाली आहेत.

मंदिर व गड परिसर हा लोकोत्सवाबरोबरच विशेष आकर्षण ठरला असून, दर्शनासोबत इतिहास, संस्कृती व निसर्गाचा संगम पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येऊ लागले आहेत. त्यामुळे जेजुरीचा विकास केवळ धार्मिक-आध्यात्मिक मर्यादेत न राहता सामाजिक, सांस्कृतिक व आधुनिक दिशेने होत आहे. या विकासाचा कणा म्हणजे दळणवळण व्यवस्था. उज्जैन, वाराणसी (बनारस), प्रयागराज यांसारख्या प्रमुख देवस्थानांप्रमाणे जेजुरी रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण विकास होणे काळाची गरज आहे.

राज्यातील अनेक रेल्वे स्थानकांवरून जसे महालक्ष्मी एक्सप्रेस, बालाजी एक्सप्रेस, कोणार्क एक्सप्रेस यांसारख्या विशेष एक्सप्रेस सुरू करण्यात आल्या आहेत. जेजुरीत थांबा देणारी लांब पल्ल्याची रेल्वे सुरू झाल्यास जेजुरीच्या धार्मिक, सांस्कृतिक व पर्यटन विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळेल, अशी अपेक्षा भाविकांनी व्यक्त केली आहे.